# OFFICE OF THE COLLECTOR AND DISTRICT MAGISTRATE
# PALGHAR

**वाचले :-**

१ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम , २००५

२ साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३ सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र./करोना २०२०/प्र.क्र.५८ आरोग्य ५ दिनांक १४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.

४ मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.DMU/2020/ CR.92/DisM-1, दिनांक २३/०३/२०२० व दि. २५/०३/२०२०.

५ मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.डीएमयु/ /२०२०/प्र.क्र.९२ डीआयएसएम-१, दिनांक २९/०३/२०२०.

---

**क्र. जि.आ.व्य.पालघर/कोरोनाविषाण/कावि-३६६/2020 .................................... दि.३१/०३/२०२०.**

**आदेश :-**

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी, राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी कोविड १९ विषाणू च्या संसर्गाचा प्रादुर्भाव झापाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून संदर्भीय ४ अन्वये मा मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संपूर्ण महाराष्ट्र क्षेत्रात लॉकडाऊन (Lockdown) ची घोषणा केलेली आहे.

ज्या अर्थी, कोविड १९ विषाणू च्या संसर्गाचा प्रादुर्भाव झापाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून संदर्भीय ५ अन्वये मा. गृह सचिव आणि अध्यक्ष राष्ट्रीय कार्यकारी समिती भारत सरकार, यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा, कलम १०(२) अन्वये संपूर्ण देशभरात मार्गदर्शक सूचना आदेश लागु केले आहेत. या अनुषंगाने नागरीकांची गर्दी होऊ नये आणि परस्पर संपर्क होवून वाढू नये या करिता जमाबंदी आदेश लागू केलेले आहेत. या पार्श्वभूमीवर ज्या विभागांकडे अत्यावश्यक व मुलभूत सेवा आहेत त्या विभागांना त्या सेवा संचालना मध्ये अडचणी निर्माण होत आहेत असे संबंधित विभागांनी कळविले आहे.

त्याअर्थी, ४ आणि ५ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मी **डॉ. कैलास बा. शिंदे जिल्हाधिकारी, पालघर** या अन्वये खालील निर्देश देत आहे.

- जिल्हयातिल राष्ट्रीय महामार्ग, राज्य व प्रमुख महामार्गाची कामे आणि दुरूस्ती करणे. व पावसाळया पुर्वीची दुरूस्तीची कामे.
- ग्रामीण रस्ते तसेच पंतप्रधान सडक योजने अंतर्गत रस्ते.
- महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि इतर विद्युत विषयक विभागाकडील इलेक्ट्रीक पोल टाकणे व इलेट्रिक मेंटनन्स, दुरूस्ती इ.
- भारत संचार निगम लिमिटेड आणि इतर दुरसंचार कंपनी कडील दूरसंचार आणि इंटरनेट सेवा संचालन, लाईन मेंटनन्स इं. खाजगी क्षेत्रातील संस्थाना BSNL चे जिल्हास्तरावरील अधिकारी यांनी लेखी आदेश दयावेत.

Parshavnath 9, Bidco Naka, Dist. Palghar. Pincode - 401 404.
Contact No: 02525 - 253111 ▪ Email: collector.palghar-mh@gov.in ▪ website: palghar.gov.in

- पाणी पुरवठा आणि जलनिस्सा:रण आणि स्वच्छता अनुषंगीक कामे.

सद्यस्थितीतील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता उपरोक्त कामे तात्काळ पूर्ण होणे गरजेचे आहे. सबब ती कामे तात्काळ पूर्ण करून घेण्यात यावीत, जेणेकरून अत्यावश्यक सेवा कोलमडणार नाही. तसेच संबंधित विभागाचे जिल्हा प्रमुख अधिकारी यांना असेही निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी उपरोक्त नमुद अत्यावश्यक सेवेसाठी नमुद अधिकारी, कर्मचारी आणि वाहने या कामी नेमणूक करून त्या प्रमाणे आदेश आपले स्तरावर काढणेत यावेत. सदर आदेशाची प्रत पोलीस विभागाकडे द्यावी आणि सर्व नियुक्त अधिकारी कर्मचारी यांना सोबत आदेशाची प्रत आणि कार्यालयाचे ओळखप्रत सोबत बाळगण्याची सुचना द्याव्यात.

तसेच उपरोक्त विभाग / संस्था यांनी कोविड १९ या विषाणू संसर्गाविषयी आवश्यक ती काळजी घ्यावी. तसेच SOCIAL DISTANCING चे नियम पाळावेत आणि आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे प्रचलित इतर अधिनियम व नियम या अन्वये योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात यावी.

सदरचा आदेश आज दि.३१/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्कयानिशी दिला असे.

**सही /- xxx**
**(डॉ. कैलास बा. शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

प्रती :- १. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. पोलीस अधीक्षक, पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणू/जव्हार यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५. उपविभागीय अधिकारी, पालघर/वसई/वाडा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, ठाणे यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, ठाणे यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि. प., पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०. कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामीण सडक योजना, पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जि.प., पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२. अधीक्षक अभियंता, म.रा.वि.म कंपनी, पालघर/वसई यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३. वरीष्ठ महाप्रबंधक, बी.एस.एन.एल, पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४. तहसिलदार, पालघर/डहाणू/तलासरी/वसई/वाडा/विक्रमगड/जव्हर/मोखाडा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१५. जिल्हा माहिती अधिकारी, पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**(डॉ. कैलास बा. शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**